INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 3 | APRIL – 2024

# गुढी मानाची - गुढी माणुसकीची

श्रीमती विजया बबन बनसोडे
एम. ए. मराठी. सेट, नेट
वडूज, जिल्हा सातारा.

गुढीपाडवा हा महाराष्ट्रातील एक प्रमुख सण आहे. तो हिंदू नववर्षाच्या प्रारंभाचा उत्सव म्हणून साजरा केला जातो. हा सण चैत्र महिन्यातील शुक्ल पक्षातील प्रतिपदा तिथीला साजरा केला जातो. गुढी पाडव्याच्या दिवशी लोक घराच्या प्रवेशव्दारी उंचावर गुढी उभारतात. गुढी म्हणजे एका उंच बांबूच्या काठीला रेशमी वस्त्र, फुलांचा हार, साखरेची गाठी आणि तांब्याचे भांडे लावून तयार केलेली एक विशेष सजावट. गुढी हे विजय आणि समृध्दीचे प्रतिक मानले जाते.



गुढीपाडव्याचा इतिहास अनेक पौराणिक कथांशी संबंधीत आहे. काही प्रमुख कथा – असे मानले जाते की शालिवाहन नावाच्या कुंभार पुत्राने मातीच्या सैनिकांच्या सैन्याने आपल्या शत्रूंवर विजय मिळवला होता. या विजयाच्या स्मरणार्थ गुढी उभारली जाते आणि शालिवाहन शक याच दिवशी सुरु होते.

पौराणिक कथेनुसार भगवान श्रीरामाने बळीचा वध करुन दक्षिण भारतातील लोकांना त्याच्या दहशतीपासून मुक्त केले, या विजयाच्या आनंदात लोकांनी घरोघरी विजयाचा झेंडा फडकवला आणि या दिवसापासून सत्ययुग सुरु झाले. असेही मानले जाते की, याच दिवशी ब्रम्हाजींनी विश्वाची निर्मिती केली आणि या दिवसापासून सत्ययुग सुरु झाले

गुढीपाडवा हा सण वसंत ऋतुच्या आगमनाचे स्वागत करण्सासाठी साजरा केला जातो. या दिवशी झाडांना नविन पालवी फुटते आणि आंब्याला मोहोर येतो. या विविध कथांमुळे गुढीपाडवा हा सण ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिक दृष्टिकोनातून महत्वाचा मानला जातो.

गुढीपाडव्याला असे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि धार्मिकमहत्व जरी असले तरी गुडीपाडव्याच्या दिवशी लाकडाच्या काठीला तांब्याभांडे उलटे का लावतात ? तेही नविन वर्षाच्या सुरुवातीच्या पहिल्याच दिवशी. कधी याबाबत विचार केला आहे का ? आपले पुर्वज खुप हुशार होते, त्यांनी खुप विचार करुनच ही पध्दत सुरु केली असेल ना. उलटे तांब्याभांडे लावण्या मागचे कारण म्हणजे नविन वर्षाच्या पहिल्या दिवशी पुर्वीचे जुनाट

विचार, राग लोभ, भांडण सर्व विसरुन डोकं रिकाम ठेवावं, पुर्वीच सर्व काही विसरुन नविन सुरुवात करावी. त्याच प्रतिक म्हणून उलटे तांब्याभांडे काठीवर ठेवण्याची पध्दत आहे. त्यामध्ये आंब्याची पाने आणि कडूलिंबाची पाने असतात. आंब्याची पाने शुभ शकून सुचित करतात. कडूलिंबाची पाने आरोग्यवर्धक आहेत. त्यामुळे त्याचा वापर करतात. जसे, आई आपल्या लाडक्या मुलाला वळण लावण्यासाठी रागावत असते, वेळप्रसंगी मारते सुध्दा. त्याप्रमाणेच कडूलिंब हे रोगप्रतिकार शक्ती वाढवण्याचे काम करते. सर्वकाही चांगले असताना कुणीही आनंदी रहू शकतो, पण परिस्थिती कितीही बिकट असली तरी जो आनंदी रहातो, आपल्या दु:खाचा लवलेशही त्याच्या चेहऱ्यावर दिसत नाही, तो खरा आनंदी. तसेच, एखाद्या टेनीस खेळाडूचा पहिलाच बॉल आऊट गेला, तर तो हार मानतो का ? अगदी शेवटच्या मिनीटापर्यंत , शेवटच्या बॉल पर्यंत तो प्रयत्न करतो. जिंकण्याची उमेद सोडत नाही. शेवटपर्यंत प्रयत्न करत रहाण्याचे  प्रतिक म्हणजे कडूलिंबाची पाने. त्याच्या सोबत साखरेची माळ (काही ठिकाणी त्याला गाठी असं म्हणतात) असते. आपल्या जिवनामध्ये सुख-दु:खाचे प्रसंग येतच असतात. त्याला खंबीरपणे सामोरे जाणे आवश्यक असते. जीवनामध्ये फक्त सुखच असेल तरी माणसाला त्याचाही कंटाळा येईल, फक्त दु:खच असेल तर सततच्या दु:खामुळे मनुष्य कोसळून जाईल, त्यामुळे सुखापाठोपाठ दु:ख येते आणि दु:खानंतर सुख येतच असते, हे जसे सत्य आहे. त्याचेच प्रतिक म्हणजे कडूलिंबाची पाने आणि साखरेची माळ. त्यामुळे कडू बरोबर गोडही असावे हा त्यामागचा उद्देश आहे. त्याचबरोबर रेशमीवस्त्र (नविन साडी) लावली जाते. नविन वस्त्र लावणे म्हणजे जीवन चैतन्याने भरलेले आहे, याची जाणीव करुन देणे. मृत व्यक्तीच्या बाजूला भांड्याने पाणी ओतले जाते आणि नंतर ते भांडे उलटे करुन ठेवले जाते किंवा काही ठिकाणी ते फोडले जाते. परंतु, गुढीपाडव्याला भांडे उलटे ठेवणे, आणि त्याखाली वस्त्र लावणे म्हणजे जिवन संपलेले नाही, जिवन अजून सुरु आहे, याची जाणीव करुन देणे. तसेच, लाकडी काठी लावली जाते, ती काठी म्हणजे शरीराचे प्रतिक आहे. जिवन जगण्यासाठी आनंदी, सुखी, समाधानी रहाणे  आवश्यक आहे. भांडे उलटे ठेवले म्हणजे, डोकं शांत आहे, शरीर मजबूत आहे, जिवन चैतन्याने भरलेले आहे, कडू-गोड प्रसंगांनी ते अजूनच निखरत आहे.

गुडीपाडव्याचा दिवशी गुडीचा सन्मान करणे म्हणजे जिवनाचा सन्मान करणे. असा सन्मान करुन जर जिवन जगता आले तर ही भांडणे, विरोध, मारामाऱ्या, तक्रारी कधीही होणार नाहीत.  जिवनाचा सन्मान करणारी ही गुढी आपण एकच दिवस लावतो. त्याच दिवशी संध्याकाळी तिची पुजा करुन ती उतरवून ठेवतो. कारण भांडे कायम उलटे ठेवून चालणार नाही, रिकामे ठेवून चालणार नाही. जीवन जगणे आवश्यक आहे, आणि ते जगत असताना त्यामध्ये अजून नविन माहिती,  नविन ज्ञान, नविन ओळखी, प्रेम मिळवणे आवश्यक आहे. नविन वर्षापासून कोऱ्यापाटीप्रमाणे आयुष्याला नव्याने सुरुवात करण्यासाठी, अधिचे जे काही वाईट आहे ते विसरुन जाऊन, नव्या उत्साहाने, शुध्द मनाने आयुष्याला सुरुवात करण्याचे प्रतिक म्हणजे गुढीपाडवा.